**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाजीराव बाबुराव गोगावले
मु.पो.गोगलवाडी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (गवनि),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडई अधिकारी,
महात्मा फुले मंडई कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३५ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाजीराव बाबुराव गोगावले
मु.पो.गोगलवाडी, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडई अधिकारी,
महात्मा फुले मंडई कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भाऊसाहेब दत्तात्रय होळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.६.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मुख्य सुरक्षा अधिकारी आपल्या पदाचा, अधिकाराचा गैरवापर, पक्षपाती निर्णय कसे घेतात याबाबत माहिती |
|---|---|

## विवेचन

पुणे महानगरपालिकचे मुख्य सुरक्षा अधिकारी श्री.ल.मा.कोंढरे हे आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करतात व पक्षपाती निर्णय कसे घेतात, अशी विचारणा करुन त्या अनुषंगाने ५४ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.बाजीराव बाबुराव गोगावले यांनी जन माहिती अधिकारी तथा मंडई अधिकारी, महात्मा फुले मंडई कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.गोगावले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दि.१४.१२.२००७ रोजी अर्ज केला होता. त्यावर काही माहिती दिली गेली, त्यानंतर आपण दि.१७.३.२००८ रोजी पुन्हा माहिती मागणारा अर्ज केला, परंतु आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.गोगावले यांनी केले.

श्री.गोगावले हे मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांवर विविध प्रकारचे आरोप करुन तशा स्वरुपाची माहिती द्यावी असे अर्ज सातत्याने करीत असतात. त्यांच्या अर्जांवर वेळोवेळी उत्तरे देण्यात आलेली आहेत. अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (गवनि), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडील अपिलाच्या सुनावणीच्या तारखांना ते उपस्थित राहिले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मंडई अधिकारी, महात्मा फुले मंडई कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भाऊसाहेब दत्तात्रय होळकर यांनी केले. श्री.गोगावले यांचे विविध अर्ज व पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली.

श्री.गोगावले यांचा अर्ज व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता माहितीच्या मागणीपेक्षा आरोपावर श्री.गोगावले यांचा भर आहे. तसेच आपण केलेले आरोप खरे मानून तशीच

माहिती द्यावी असा त्यांचा आग्रह दिसतो. 'आपल्या निवासस्थानी ठेवलेल्या ॲम्युनिशनचा दुरुपयोग केला जातो?, 'ज्या सेवकांची उंची भरत नसताना किती जणांना कामावर रुजू करुन घेतले आहे, सन १९९४/१९९५ मध्ये श्री.गोगावले हे ९ दिवस वैद्यकीय रजेवर असताना व त्यांची हक्काची/वैद्यकीय रजा शिल्लक असताना कोणत्या नियमाप्रमाणे पाच दिवसांची रजा अमान्य करुन रक्कम ५०० रुपये कोषागार मध्ये ठेवली आहे. सर्वच दिवसाची रक्कम अमान्य केली नाही. समक्ष भेटूनसुध्दा रक्कम अदा करावी. असा शेरा फार्मवर मारला नाही, मुख्य सुरखा अधिकारी आपला अधिकार कसा आहे हे दाखवण्याकरीता असे केले?' अशा स्वरुपाचे अनेक प्रश्न व विधाने अर्जांमध्ये आहेत. त्यांनी सादर केलेल्या पूरक कागदपत्रांही माहितीच्या मुद्दयापेक्षा भाष्य अधिक आहे. अशा स्वरुपाच्या मागणीचा 'माहिती' म्हणून विचार करता येणार नाही, मात्र देय माहिती दिली गेली पाहिजे. केवळ 'हे खरे नाही,' 'नियमानुसार भरती केली जाते' अशा स्वरुपाची संदिग्ध उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी काही बाबतीत दिली आहेत, तीही योग्य नाहीत. नेमकेपणाने मूळ विचारणेनुसार माहिती दिली गेली पाहिजे. वारंवार त्याच स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज, अपिले न करण्याची समज अपीलकर्ते श्री.बाजीराव बाबुराव गोगावले यांना देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा मंडई अधिकारी, महात्मा फुले मंडई कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अपीलकर्त्याच्या मागणीतील देय माहिती दि.३०.५.३००९ पर्यंत नेमकेपणाने देऊन अनुपालन अहवाल आयोगाला आठ दिवसात सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. जगन्नाथ देवराम पवार
शासकीय निवासस्थान वर्ग २ अधिकारी,
मधुबन, सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी,
उपसंचालक,
रोजगार व स्वयंरोजगार,
विभागीय मुख्यालय, पुणे
जेल रोड, येरवडा, पुणे ६.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी,
रोजगार व स्वयंरोजगार,
विभागीय मुख्यालय, पुणे
जेल रोड, येरवडा, पुणे ६.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/१०/२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -१०.११.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९/११/२००६ |
| ५ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/१२/२००६ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | अपीलकर्ता व इतरांविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे नोंदविलेल्या गुन्हा क्र. १६७/०६ मध्ये शासनाच्या मंजुरीचे आदेश, अन्य पुरावे इ. अनुषंगिक पत्रव्यवहार. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.जगन्नाथ देवराम पवार यांनी त्यांच्यासह काहीजणांविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे नोंदविलेल्या गुन्हा क्र.१६७/०६ मध्ये शासनाच्या मंजुरीचे आदेश, अन्य पुरावे, अनुषंगिक पत्रव्यवहार या माहितीची मागणी केली होती.

तपास चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (ज) नुसार माहिती देत येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. तोच निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी कायम केला. त्याविरुध्द श्री. जगन्नाथ देवराम पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. प्रस्तुत अपिलाचा समावेश राज्य माहिती आयोगाने दि. १३/०५/०८ रोजी आयोजीत केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी अपीलकर्ता श्री.पवार यांना पाठविण्यात आलेले पत्र 'पत्ता सोडून गेले' असा पोस्टाचा शेरा मारुन बटवडा न होता परत आले आहे.

प्रस्तुत अपिलाची दाखल कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.
२. प्रस्तुत प्रकरणात तपास पूर्ण झाला असल्यास अपीलकर्त्यास माहिती देऊन पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७-०५-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २४८३ /पुणे | श्री.हासानंद साधुराम खटवानी चामोर्शी रोड, साई मंदीर रोड समोर, ता.जि.गडचिरोली | माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आ-३, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे | संचालक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख कार्यालय, पुणे-१ | मौजे रायपूर (तु) गडचिरोली येथील स.नं.१५७, प्लॉट क्र.५ रजिस्ट्रिप्रमाणे हद्द कायम करुन अतिक्रमण दूर करणे | १) सारख्याच माहिती मागणी संदर्भात राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांनी अपील क्र.६८/०८, ६९/०८, ७०/०८ मध्ये दि.२७.०२.२००९ रोजी निर्णय दिलेला असल्याने सदरचे अपील नाकारण्यात येत आहे. |
| २ | २५९६/ पुणे | ॲड. विकास जोशी साई सदन, फ्लॅट नं.२९, ४ था मजला, पुण्याईनगर, धनकवडी, पुणे-४३ | निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, जि.पुणे | तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, जि.पुणे | जिल्हाधिकारी पुणे (महसूल शाखा) यांनी सदरचे प्रकरण चौकशीसाठी आपलेकडे पाठविले होते. कृपया फाईलचे इन्सपेक्शन व्हावे. | १) अपीलकर्त्यास फक्त फेरफार ३२६६ ची प्रत दिली आहे. मूळ संचिका उपलब्ध होत नसल्याचे कळविले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा २००५ अन्वये |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जतनाचा कालावधी आयोगास कळवावा अन्यथा संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन पुढील अहवाल आयोगास सादर करावा. |
| ३ | २६८६/ पुणे | श्री.चंद्रकांत बाळोबा खाडे रा.आंबिकानगर (देवीचा माळ), रा.इंदापूर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | रेशनकार्ड रद्द बाबत व त्या अनुषंगाने माहिती | श्री.खाडे सध्या इंदापूर येथे राहत असून ते जेव्हा हिंगणगाव येथे राहणेस जातील व पुनश्च शिधापत्रिका मागणीबाबतचा अर्ज करतील तेव्हा त्यांना हिंगणगाव येथील शिधापत्रिका देण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.०३.०३.२००९ - च्या अहवालात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (क्रमांक २४८३, २५९६ व २६८६ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दिनांक :१८-०५-२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर
द्वारा साप्ताहिक यशोधरा, महानगरपालिका कार्यालयासमोर,
तांदुळ मार्केट, मिरज ४१६४१० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३+२८७ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मिरज, जि.सांगली प्रतिनिधी श्री.दिनेश ज.पारगे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय मिरज, जि.सांगली श्री.डी.एस.कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.३.२००७, १७.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.४.२००७ १४.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मिरज तालुका अवैध दारुबंदी समिती गठीत केल्याचा दिनांक, समितीचा कार्यकाल, समितीच्या सदस्यांचे नाव, पत्ता, फोन नंबर, बैठकांचा तपशील, बैठक दिनांक व निर्णय चित्रपटगृह, नाट्यगृह बांधण्यासंबंधी परवानगी व तदनुषंगिक माहिती. |
|---|---|

## विवेचन

अवैध दारुधंदे व चित्रपटगृह, नाट्यगृह बांधणे याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय मिरज, जि.सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर योग्य माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.खाडिलकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

विहित मुदतीत श्री.खाडिलकर यांना उत्तर दिले, परंतु त्यांचे समाधान झालेले नाही. आवश्यक असल्यास कागदपत्रे दाखवून पुन्हा नि:शुल्क माहिती देण्याची दक्षता घेत आहोत, असे जन माहिती अधिकारी श्री.डी.एस.कुंभार व अपिलीय प्राधिकारी डॉ.विकास खरात यांनी आयोगाने आयोजित केलेल्या दि.२२.१०.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. तसेच दोन्ही अपिलांमध्ये आवश्यक ती माहिती मिळाली असून आपण त्याबाबत समाधानी आहोत व कोणतीही तक्रार राहिलेली नाही, त्यामुळे अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन, श्री.खाडिलकर अर्धांगवायूने पीडित असल्यामुळे त्यांच्या वतीने त्यांच्या पत्नी सौ.अपर्णा मोरेश्वर खाडिलकर यांनी दि.२८.४.२००९ रोजी आयोगाला सादर केले.

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१३.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | विवेचन / निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८५९ /पुणे | श्री.परशराम बबन शेलार मु.पो.राजंणगाव गणपती, ता.शिरुर, जि.पुणे | शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बारामती उपविभाग, बारामती, जि.पुणे | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बारामती उपविभाग, बारामती, जि.पुणे | आरटीएस ८७/२००८ हे अपील का फेटाळण्यात आले याबाबतची माहिती देऊन, अपील पुन्हा चालू करण्याची मागणी केली आहे. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.२२.०१.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| २ | २८६३ /पुणे | श्री.पिराजी नामदेव सरोदे ४२१, शुक्रवार पेठ, तळेगाव-दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | आस्थापना प्रमुख, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | नगरपरिषदेतील स्वतःच्या व अन्य कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक तसेच आर्थिक बाबींसदर्भात माहिती | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.१७.१२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयातील मीमांसास मान्यता देऊन तो निकाल कायम करण्यात येत आहे. |
| ३ | २९०७ /पुणे | श्री.संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे | गाव कामगार तलाठी, मेखळी, ता.बारामती, जि.पुणे | मंडल अधिकारी, मंडल अधिकारी बारामती, ता.बारामती, जि.पुणे | सन २००५-२००८ या कालावधीतील पिवळे रेशनकार्ड नं वाय के ०९६८१७ मधील नाव कमी करण्याबाबत माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. अपील अमान्य. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २९२३ /पुणे | श्री.मुकेश सुरेश चव्हाण स.नं.२२/१/१, समर्थ हॉस्पीटलजवळ, भुमकर किराणा लाईन, थिटे वस्ती, खराडी, जि.पुणे | गाव कामगार तलाठी, पारे, ता.सांगोला, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर | मौजे पारे, ता.सांगोला येथील ग.नं.१६९ वरील फेरफार क्र.७६६ ला अनुसरुन एकूण १३ मुद्यांची माहिती | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.०४.०२.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ५ | २९३३ /पुणे | श्री.गोकुळ त्रिंबक शिंदे लोणी खुर्द, ता.राहता, जि.अहमदनगर | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दौंड, ता.दौंड, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे | दि.०१.०४.२००७ ते ३१.१०.२००८ या कालावधीत कार्यरत असणाऱ्या शाखा अभियंत्यांनी कोण कोणती कामे केली ते कधी पासून एकाच ठिकाणी कार्यरत आहेत, इ.१७ मुद्यांची माहिती | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.२१.०२.२००९ रोजी निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ६ | ३०३२ /पुणे | श्री.विश्वास शंकरराव बनकर मु.पो.बारामती, मोरगाव टोलनाक्या - जवळ, जि.पुणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे | मोरगाव-बारामती हा रस्ता जिल्हा परिषद रस्ता बारामती हद्दीतून निरा डावा कॅनॉल पूलापर्यंत कोणकोणते सर्व्हे नं येतात. या अनुषंगाने ३ मुद्यांची माहिती | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.१३.०१.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ७ | ३०३५ /पुणे | श्री. बबन आण्पाजी बांगर मु.पो. नारायणगाव, कुकडी कॉलनी, ता.जुन्नर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे | मौजे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे येथील स.नं.८०/१, ८१/२, ८०/१ब व ६६/१ मधून जाणाऱ्या रस्त्याबाबत | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. अपील अमान्य. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ ( अपील क्रमांक २८५९, २८६३, २९०७, २९२३, २९३३, ३०३२ व ३०३५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०८-०५-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २९३७/ पुणे | श्री.राजाराम भाऊ ढगे कोंडीवडे ता.मावळ, जि.पुणे | सहायक जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पुणे ग्रामीण पोलीस,पुणे | अप्पर पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण पोलीस, पुणे | दि.२६.०९.२००८ रोजीच्या तक्रारी अर्जावर झालेल्या दैनंदिन तपासाबाबतच्या तपशीलात्मक अहवाल व तद्अनुषंगाने माहिती मिळणेबाबत | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.१२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची दखल घेऊन त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात आयोगाकडे सादर करावा. |
| २ | ३०३०/ पुणे | महादेव लक्ष्मण वाघमारे क्लासिक एंपोरियम बिल्डिंग, फ्लॅट नं.२, सेंट पॅट्रीक टाऊनजवळ, पुणे-सोलापूर रोड, हडपसर, पुणे -१३ | क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय हडपसर, पुणे. मनपा, हडपसर पुणे | उपायुक्त क्र.४ ढेरेभवन, पुणे मनपा, टिळक रोड, पुणे | हडपसर स.न.२९६/१/ प्लॉट नं.४ संबंधी उदा बांधकाम, एफएसआय, नकाशे, बांधकाम मान्यता इ.ची माहिती मिळणेबाबत | १) मुख्य मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसून प्रशासकीय कार्यवाही अंतर्गत येते.<br>२) तक्रारी, मागणी यांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात द्यावी. |
| ३ | ३०३१/ पुणे | श्री.सुदीन भालचंद्र देशपांडे २३२ बी, शुक्रवार पेठ, यशोदा रेसीडन्सी, पुणे-२ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोणजे, ता.हवेली, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती हवेली, पुणे-१ | डोणजे गावतील घर व बखळ जागेची नोंद श्री.वि.म. देशपांडे याच नावे होण्याबाबत व दि.३१.०१.०६ रोजीचे संमती पत्र २६ होणेबाबत बखळ जागेवरील अतिक्रमण व इत्यादीबाबतची माहिती मिळणेबाबत | १) मुख्य मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसून प्रशासकीय कार्यवाहीत येते. २) मात्र जन माहिती अधिकारी यांनी अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अर्जदारास माहिती द्यावी. |
| ४ | ३०३८/ पुणे | श्री.संभाजी मधुकर चव्हाण मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती इंदापूर, जि.पुणे | श्री जगन्नाथ संभाजी चव्हाण हे सन १९५३-५४ मध्ये शिक्षण घेत होते. शाळा सोडल्याचा दाखला घेतला होता त्या रजिस्टरचा दूबार दाखला मिळावा. | १) माहिती दिली आहे. २) दाखल्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नसून संबंधित नियमाव-लीनुसार अर्ज करावा. |
| ५ | ३०३९/ पुणे | श्री.रविंद्र सदाशिवराव यादव स.नं.१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे - ६ | तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे आवार, पुणे | उपविभागीय अधिकारी, पुणे उप विभाग,पुणे-१ | उत्पन्नाचा दाखला सन २००७-२००८ क्र.०८०६५८१ ७२ या विषयास अनुसरुन | १) जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे २) अपिलकर्त्याची |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शास्तीची मागणी अमान्य.<br>३) खुलासा, मत, भाष्य, संभाव्य कृती हे 'माहिती' म्हणून मागता येत नाही. |
| ६ | ३०४४ / पुणे | श्री.घन:शाम शंकर बोत्रे रा.देहूगाव, ता.हवेली, जि.पुणे | माहिती अधिकारी तथा सह निबंधक हवेली क्र.१ पुणे शहर तहसील कार्यालय आवार, पुणे-२ | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-१ | रजि.खरेदीखत क्र.१३५७ दि.०५.०७.१९७१ ची सही शिक्यानिशी प्रमाणित प्रत मिळणेबाबत | १) संबंधित कार्यालयाच्या नियमावलीनुसार स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ७ | ३०४८ /पुणे | श्री.रमणप्रित सिंग सनशाईन पार्क, फ्लॅट नं.५, बालेवाडी, पुणे -४५ | शासकीय माहिती अधिकारी, ए.सी.पी.चतु:शृंगी विभाग, औंध, पुणे | अपिलीय प्राधिकारी, डी.सी.पी.पिंपरी-चिंचवड, पुणे | पोलीस इन्सपेक्टर श्री.शेषराव सूर्यवंशी यांचा एकूण पगार किती व तद्संबंधित इतर सेवेविषयी माहिती | १) अपूर्ण कागदपत्रांमुळे अपील नाकारणे येत आहे.<br>२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जातील मुद्दा क्र.१ बाबत श्री.शेषराव सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक यांचे वेतनविषयक माहिती उपलब्ध करुन द्यावी.<br>३) श्री.शेषराव सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक यांच्या मालमत्तेबाबतची माहिती व्यक्तिगत , त्रयस्थ पक्षाची असल्याने नाकारणे योग्य आहे. |

रकाना ७ मध्ये दिलेल्या कारणास्तव आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ (क्रमांक २९३७, ३०३०, ३०३१, ३०३८, ३०३९, ३०४४ व ३०४८ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) ज्या अपिलांमध्ये जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून आयोगाने कार्यपूर्ती अहवाल मागविले आहेत, त्या प्रकरणी विहित मुदतीत अहवाल न प्राप्त झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार व शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : १३-०५-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील** 934

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.सुधाकर दिनकर किर्वे
सर्व्हे क्र.२४, आंबेगाव पठार बु.
श्री समर्थ स्वामी मठाजवळ, आंबेगाव, धनकवडी शिव, पुणे- ४६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी,
१८-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४ + ३१४ अ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.०५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर दिनकर किर्वे
सर्व्हे क्र.२४, आंबेगाव पठार बु.,
श्री समर्थ स्वामी मठाजवळ, आंबेगाव, धनकवडी शिव, पुणे-४६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी,
१८-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.०१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि..-- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>निवडुंग सहकारी गृहनिर्माण संस्था, धायारी, पुणे-४२ या संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्यांची संपूर्ण माहिती. संस्थेचे लेखापरीक्षक, वास्तुशास्त्रज्ञ यांची नांवे, पत्ता, संस्थेची पडताळणी सहकार खात्याने केव्हा केली, घेतलेले आक्षेप, संस्थेस दिलेला शेरा. संस्थेचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे काय, कर्जदार सभासदांचे वेळोवेळी कर्ज हप्ता मुक्त झालेल्या कर्जाची रक्कम, तपशील, तसेच मुक्त झालेला धनादेश बिल्डरला की संस्थेला दिला गेला इ. माहिती |

**सुधारित आदेश**

**वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.२४.१०.२००८**

**विवेचन**

श्री.सुधाकर दिनकर किर्वे यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने केलेल्या आदेशामधील अ.क्र.४ येथे 'श्री.सी.बी.चौधरी, उप सचिव यांनी ४५ दिवसात निर्णय देणे आवश्यक होते याची जाणीव व ही पूर्तता न केल्याबद्दल समज देण्यात येत आहे.' असे नमूद केले आहे. याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव यांनी खालीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक खुलासा दि.२१.११.२००८ च्या निवेदनाद्वारे सादर केला आहे :-

श्री.किर्वे यांच्या दि.०९.०१.२००६ च्या अर्जावर दि.२४.०१.२००६ रोजी माहिती दिलेली असून दि.२२.०१.२००६ च्या अपील अर्जावर दि.१७.०३.२००६ रोजी माहिती देण्यात आलेली आहे. या कालावधीत या अर्जाच्या आणि अपील अर्जाबाबतचा गृहनिर्माण हा विषय माझ्याकडे नव्हता. त्यामुळे या दि.०९.०१.२००६ चा मूळ अर्ज व दि.२२.०२.२००६ च्या अपील अर्जाबाबत माझा संबंध नाही. श्री.किर्वे यांनी वेगवेगळ्या प्राधिकाऱ्यांकडे तसेच वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे अनेक मुद्यांवर अर्ज सादर केलेले होते. असाच एक दि.१४.०१.२००८ चा अर्ज जो जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे व उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांना उद्देशून सादर केलेला होता. त्या अर्जाची प्रत उप सचिव म्हणून माझ्याकडे दि.२१.०१.२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि सदर अर्ज माहितीच्या अधिकारान्वये सादर करण्यात आलेला नव्हता. परंतु त्यांनी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे दिलेले अर्ज व उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेऊन त्यांना माहिती मिळण्यासाठी सदरचा अर्ज माझ्या स्तरावर (माहितीच्या अधिकाराखाली दाखल केलेला नसतानाही) माहितीच्या अधिकाराखाली ग्राह्य धरुन दि.२७.०२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.०३.०३.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. उपरोक्तनुसार श्री.किर्वे यांचा दि.०९.०१.२००६ चा अर्ज व दि.२२.०२.२००६ चे अपिलावर मुदतीत कार्यवाही करण्यात आली आहे. त्या कालावधीत या अर्जाशी संबंधित विषयाचा कार्यभार

माझ्याकडे नव्हता. यास्तव आयोगाच्या दि.२४.१०.२००८ चे आदेशातील अ.क्र.४ येथील आदेश वगळण्यात यावेत, अशी श्री.चौधरी यांनी विनंती केलेली आहे.

श्री.किर्वे यांनी दि.२२.०२.२००६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर अपिलीय प्राधिकाऱ्याने सुनावणी घेतल्याचे दिसत नाही. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्याने श्री.किर्वे यांना काहीही उत्तर / माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी श्री.नार्वेकर यांनीच प्रथम अपिलास उत्तर दिलेले आहे, हे योग्य नाही. श्री.सी.बी.चौधरी यांचा खुलासा विचारात घेता आयोगाच्या दि.२४.१०.२००८ रोजीच्या आदेशामधील अ.क्र.४ येथील आदेश वगळण्याची उप सचिव श्री.सी.बी.चौधरी यांची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अ.क्र.४ दि.२४.१०.२००८ चे आदेशामधील श्री.सी.बी.चौधरी यांना देण्यात आलेली समज रद्द करण्यात येत आहे.

२) श्री.किर्वे यांनी दि.२२.०२.२००६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलास जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांनी उत्तर देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार योग्य नाही. याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ श्री.रविंद्र नार्वेकर यांना समज देण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. : ११ -०५-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३५ | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | प्रभारी अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,सांगली, जिल्हा सांगली | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,सांगली, जिल्हा सांगली | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४ अन्वये १७ मुद्दयांची माहिती मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ (क) च्या अनुषंगाने ६ मुद्दयांची माहिती. | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ३६ | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | सहा संचालक, नगर रचना, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | बांधकाम परवाना व इतर ५ मुद्दयांची माहिती. | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ३७ | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | प्र.शहर अभियंता, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, जलशुध्दीकरण केंद्र व भारत सूत गिरणीजवळ कुपवाड येथे बांधण्यात आलेल्या मंदिरास बांधकाम परवानगीबाबत माहिती व इतर रस्त्यांच्या अनुषंगाने एकूण ७ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३८ | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | पुरवठा निरिक्षक, तहसील कार्यालय, मिरज, जि.सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, मिरज, जि.सांगली | सन २००० ते माहे फेब्रु २००९ या कालावधीतील शुभ्र केसरी व पिवळया शिधावाटप पत्रिकेतून प्राप्त झालेल्या उप्तन्नाची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | ३९ | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | लेखाधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,सांगली , जि.सांगली | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली, जि.सांगली | सन २००० ते फेब्रु २००९ या कालावधीतील श्री.एम.एस.भानुसे, आरेखक ंच्या पात्रता व बदली याबाबत माहिती तसेच सेवा पुस्तकाच्या छायांकित प्रती. | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र.३५/२००९, ३६/२००९, ३७/२००९, ३८/२००९ व ३९ /२००९/ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७-०५-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४० | श्री.अनिल शिवाजी भोळे आष्टा, (साईनगर, बागणी रोड) ता.वाळवा, जि.सांगली | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,वाळवा, इस्लामपूर, जि.सांगली | तहसीलदार, वाळवा-इस्लामपूर, जिल्हा सांगली | मूळ अर्जातील मागणी आपटा महानगरपालिका हद्दीतील रि.सं.९ मधील प्लॉट नं ९/५९ च्या खरेदीची ८०/१२ दप्तरी नोंदीसाठी कोणकोणत्या दस्तऐवजाची आवश्यकता आहे याबाबत माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. |
| २ | ४१ | श्री.अब्बास अली इब्राहिम जमादार डॉ.सय्यद यांचे शेजारी, शामरावनगर, सांगली | सह.संचालक, नगररचनाकार, सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, सांगली | अति. आयुक्त, सांगली मिरज आणि कपवाड महानगरपालिका, सांगली | सर्व्हे नं.४८३/१ ब भुखंडाबाबतची संपूर्ण माहिती, नगररचना विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रती इ.३ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ४९ | सुदाम रंगराव पाटिल, रा.कापूसखेड , ता.वाळवा, जि.सांगली | सहायक निबंधक, सहकारी संस्था, सांगली | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे मोबाईल क्र.,प्रापर्टी इ. ४ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पूर्ण माहिती दिली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५१ | सुरेश भिमराव रणपिसे, मु.पो.चिंचणी (मंगरुळ), ता.विटा,जि.सांगली | तहसीलदार, खानापूर, ता.खानापूर, जिल्हा सांगली | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली | जमीन गट नं. ५९१,गाव मंगरुळ, ता.खानापूर-विटा, जि.सांगली च्या ७/१२ व फेरफार नोंदीतील सत्य काय आहे? | १.माहिती अर्जातील मागणी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.<br>२. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास ८ दिवसात द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (क्र.४०/२००९, ४१/२००९, ४९/२००९, ५१/२००९ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ५१/सांगली मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती देऊन आठ दिवसात अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.०५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भगवान ज्ञानू अवघडे
स.नं.१५/२ब, गोळीबार मैदान,
रामकृष्णकॉलनी, प्लॉट नं.१०, कसबा-बावडा, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२२२२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा डायरेक्टर, स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२२२२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४६ / कोल्हापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२२२२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा डायरेक्टर, स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२२२२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१०.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पीएचडी संशोधन प्रस्तावाच्या संबंधात BUTR व RRC बाबतचे सर्व शेरे. पीएचडी संशोधनासाठी पात्रतेसंबंधी निकषाची प्रत, परिपत्रके, वटहुकूम, आदेश सत्यप्रत. प्रस्ताव निकाली काढण्याबाबत निर्धारित कालावधीसंबंधी आदेश इ. संशोधनासाठी फी, शिक्षण फी इ.संबंधी माहिती, फी बदलाचा चार्ट, मागासवर्गीयांसाठी फीमध्ये असलेल्या सवलतींची माहिती. | |

## विवेचन

आपल्या प्रबंधाच्या विषयाच्या अनुषंगाने बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टिचिंग ॲण्ड रिसर्च कमिटी (BUTR) ने मान्यता न दिल्याच्या अनुषंगाने सर्व शेरे व अन्य माहिती अपीलकर्ता श्री.भगवान ज्ञानू अवघडे यांनी जन माहिती अधिकारी तथा डायरेक्टर स्कूल ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे मागितली होती. आपल्याला योग्य ती माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडण्याची संधी न देता अपील निकाली काढले म्हणून श्री.अवघडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.अवघडे यांना विहित मुदतीत शुल्क भरण्यास कळविले. शुल्क भरणा झाल्यानंतर त्यांना माहिती पाठविण्यात आली. अपिलाची दखलही विहित मुदतीत घेण्यात आली. दि.१२.१.२००९ रोजी १.डॉ.राजेंद्र वडनेरे, कुलसचिव तथा अपिलीय अधिकारी २.डॉ.रमेश शेकोकार, माहिती अधिकारी ३.प्रा.श्री.सुरेंद्र पाटोळे, अधिव्याख्याता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ४.श्री.भगवान ज्ञानू अवघडे, अपीलकर्ता याच्यासह एकत्रित सुनावणी करुन मुद्देनिहाय चर्चा करण्यात आली, त्यात श्री.अवघडे यांचे समाधान झाले, असे अपिलीय प्राधिकारी डॉ.राजेंद्र वडनेरे यांनी दि.७.२.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद केले. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी सुनावणीत केला. अपीलकर्त्यांची स्वाक्षरी असलेली संबंधित बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनील बर्वे व अपिलीय प्राधिकारी डॉ.राजेंद्र वडनेरे यांनी सादर केली. श्री.अवघडे यांनी मूळ अर्जात मागितलेल्या माहितीपेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात नव्याने मागितली, त्यामुळे मूळ अर्जावरील उत्तरात जन माहिती अधिकाऱ्यांनी ती देणे शक्य व आवश्यक नव्हते. नव्याने मागितलेली माहिती मोघम असून नेमकेपणाने मागितल्यास माहिती देता येईल, असे श्री.अवघडे यांना दि.८.११.२००८ रोजी कळविल्याचेही डॉ.वडनेरे यानी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'प्रमाणेच आयोगापुढील सुनावणीलाही श्री.अवघडे उपस्थित नव्हते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता डॉ.वडनेरे यांनी केलेल्या निवेदनानुसार माहिती देण्यात आली असल्याचे स्पष्ट होते. मूळ अर्जापक्षा अतिरिक्त माहिती अपिलात मागता येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१३.५.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८१/ पुणे | श्री.रमेश रा.फोंडगे ५४-ब, हनुमाननगर, पुणे -१६ | नगर उप अभियंता, (व्हे.डेपो), पुणे महानगरपालिका, पुणे - ५ | नगर अभियंता, (व्हे.डेपो), पुणे महानगरपालिका, पुणे - ५ | महानगरपालिकेच्या वाहनांचा, नगरसेवक पदाधिकारी यांचेकडून होणाऱ्या वापराबाबतची माहिती | आवश्यक माहिती दि.२२.११.२००७ रोजी मिळाली असल्याने कोणतीही तक्रार नाही, असे अपीलकर्त्याने दि.०७.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | १०७१/ पुणे | श्री.दिलीप पंढरीनाथ जगताप बी-३,स.नं.२७०/ २७१, नवनटराज हौ.सो., पर्वती, पुणे ४११ ००३ | प्रशासन अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१ | प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ३ महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१ | प्रबंधक / प्रशासकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबतची माहिती | अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने दि.२७.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अवगत केले आहे. |
| ३ | १५२६/ पुणे | श्री.अशोक जनार्दन फडणीस विश्वस्त, श्री विष्णुदेव संस्थान, | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, | तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | महसूल व व वन. विभाग शा.नि.क्र.डीईव्ही ३४०५/५६७/ प्र.क्र .१०९/ ल-४, | शासनाने मंजूर केलेली रक्कम तहसीलदार, मावळ यांचेकडून (दि.१९.०७.०८ रोजी) मिळाली |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बेलबाग, घर क्रमांक १७७/१७८, बुधवार पेठ, पुणे २ | जि.पुणे | | दि.२५.०६.२००७ नुसार मौजे वाकसई गावच्या देवस्थानच्या वसुलीबाबत माहिती | असल्याने, अपील निकाली काढण्याबाबतचे पत्र अपीलकर्ते श्री.फडणीस यांनी दि.३०.०४.२००९ रोजी आयोगास पाठविले आहे. |
| ४ | १४७१/ पुणे | सौ.राज ह. बम्ब क्षितीज अपार्टमेंट, ३६, कोहिनूर प्लॅनेट, सर्व्हे नं.१३/६, औंध, पुणे ७ | निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर (औंध विभाग), तहसील कार्यालय, पुणे | तहसीलदार, पुणे शहर (औंध विभाग), तहसील कार्यालय पुणे, शहर पुणे | दि.०३.०५.२००७ रोजी खरेदी खताच्या दस्ताची नोंद होणेसाठी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती | तहसील कार्यालय, औंध विभाग, पुणे यांचेकडून माहिती मिळाली आहे. सबब अपील निकाली काढणेबाबत अपीलकर्त्या सौ.बम्ब यांनी दि.०४.०५.२००९ रोजी आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक ५८१, १०७१, १५२६ व १४७१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११ -०५ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जावेद सर्फराज शेख
काशाना ए हक, सॅलीसबरी पार्क, मार्केट यार्ड,
पंडित नेहरु रस्ता, पुणे-३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुण महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३८ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती हर्षदा शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>अतिरिक्त आयुक्त (विशेष ), पुण महानगरपालिका, पुणे यांच्या दालनामध्ये दि.९.१२.२००४ रोजी बीपीएमसीॲक्ट कलम २०५ अन्वये जे रस्ते ताब्यात घ्यायचे होते त्या संदर्भात झालेल्या बैठकीतील ठरावांच्या कार्यवाहीची माहिती. |
|---|---|

## विवेचन

बीपीएमसीॲक्ट कलम २०५ अन्वये ताब्यात घ्यावयाच्या रस्त्यांसंबंधात अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या कार्यालयात दि.९.१२.२००४ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावांच्या कार्यवाहीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून अपुरी व टाळाटाळ करणारी मिळाली, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.जावेद सर्फराज शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

स.नं.५५७ मुंजेरी (गुलटेकडी) म्हणजेच अंतिम भूखंड क्र.४७३ मधील अंतर्गत रस्त्याच्या अनुषंगाने श्री.शेख गेल्या काही वर्षांपासून नुकसानभरपाईबाबतचा विषय मांडत आले आहेत. माहितीच्या अधिकारातही याबाबतची विविध स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज त्यांनी केले आहेत. आपल्या मिळकतीमध्ये रस्ते होऊनही आपल्याला नुकसानभरपाई मिळालेली नाही. त्या अनुषंगाने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांकडे बैठक होऊन बराच कालावधी उलटला तरी त्यावर कोणतीही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे आपले कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे, असा दावा त्यांनी यापूर्वीच्या अपिलाप्रमाणेच (अपील क्र.२४/पुणे) या अपिलातही केला आहे.

जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी श्री.शेख याच्या दि.४.४.२००६ च्या अर्जाला दि.२.५.२००६ रोजी उत्तर पाठवून दोन मुद्दयांची माहिती दिली व बैठकीच्या इतिवृत्ताबाबतची माहिती संकलीत करण्यात येत असून ती देण्यास १५ दिवस लागतील, असे कळविले. दि.७.६.२००६ रोजी त्यांनी माहिती दिली. 'विषयांकित बैठकीत १५ रस्त्यांच्या आखणीबाबत चर्चा झाली. त्यापैकी नऊ रस्त्यांच्या प्रकरणाला मान्यता देण्यात आली, त्यातील ५ रस्त्यांबाबतची विषयपत्रे नगर सचिवांकडे सादर

करण्यात आली असून ऊर्वरित चार प्रकरणांबाबत कार्यवाही चालू आहे,' असे जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरात यांनी श्री.शेख यांना कळविले. त्याविरुध्द श्री.शेख यांनी केलेल्या अपिलाची योग्य ती दखल घेतली गेली नाही, असे श्री.शेख यांचे म्हणणे आहे.

माहिती एकाच पानाची असली तरी नऊ प्रकरणांबाबत इतर खात्याशी संपर्क साधून ती द्यावयाची असल्याने मुदत मागितली व नंतर माहिती दिली. संबंधित विषयाच्या प्रक्रियेतही काही अवधी जातो, त्यामुळे विलंब झाला, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरात यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही. परंतु विषयांकित प्रकरणातील तपशील श्री.शेख यांना माहितीच्या अधिकारात व अन्य पत्रव्यवहारातही कळविण्यात आलेला आहे. दि.१४.६.२००७ रोजी याबाबतची सर्व कागदपत्रे त्याना देण्यात आली आहेत. नगर भूमापन अधिकारी क्र.२ यांच्याकडून आलेली माहितीही दि.२५.७.२००७ रोजी त्यांना पाठविण्यात आलेली आहे. तसेच हे प्रकरण नगरभूमापन कार्यालयाकडे प्रलंबित आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका श्री.अनिरुध्द पावसकर यांनी दि.१७.११.२००७ च्या निवेदनान्वये आयोगाला कळविले असून त्याचा पुनरुच्चार ज़न माहिती अधिकारी श्रीमती हर्षदा शिंदे व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रविण गेडाम यांनी सुनावणीत केला. 'एफ.पी.नं.४७३ सब प्लॉट क्र.१ व ९ या मिळकतीचे उत्तरेकडील भागात झालेला रस्ता हा बी.पी.एम.सी.ॲक्टचे कलम २०५ अन्वये आखणेची अपिलकर्त्याची मागणी आहे. टी.पी.एस.-III ची कार्यवाही शासनाचे नगररचना विभागाकडून झालेली असून टी.पी.एस.-III चे १इंच : ५०फूट स्केलचे नकाशात सदरचा रस्ता कॉलनी रस्ता दर्शविलेला असल्याने पुनश्च रस्ता आखणेची आवश्यकता नाही,' असे जन माहिती अधिकारी श्री.अनिरुध्द पावसकर यांनी या पत्रात म्हटले असून त्याचा पुनरुच्चार अपिलीय प्राधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण गेडाम यांनी दि.१४.८.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या अहवालात केला आहे.

टी.पी.स्कीम-||| मध्ये १इंच : ५०फूट स्केलच्या नकाशात अंतिम भूखंड क्र.४७३ सब प्लॉट क्र.१६ व ९ च्या उत्तरेकडील रस्ता दाखविला असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी म्हटले आहे, ते चुकीचे आहे. असा नकाशा महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभागाने तयार केलेला नसून तो असल्यास त्याची प्रत नगररचना विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या शिक्क्यासह आपल्याला मिळावी, असे निवेदन श्री.शेख यांनी दि.२९.८.२००८ रोजी आयोगाला सादर केले. टी.पी.स्कीममधील १इंच : ५०फूट सकेलच्या नकाशाची प्रत श्री.शेख यांना दिली जाणे आवश्यक आहे. मात्र या स्कीमची कार्यवाही शासनाच्या नगररचना विभागाकडून झाली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पत्रात नमूद केले आहे. तसेच अंतिम भूखंड क्र.४७३ टी.पी.स्कीमचा भाग नकाशा अपील क्र.२४ च्या सुनावणीच्या वेळीच (दि.१३.६.२००७ रोजी) उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे श्रीमती साधना नाईक यांनी श्री.शेख यांना दिला आहे. त्याने श्री.शेख यांचे समाधान झाले नसल्यास वरीलप्रमाणे नकाशाची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्राप्त करुन द्यावी.

रस्त्याची फेरआखणी करण्याची मागणी किंवा कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा हे विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाहीत. त्यामुळे आयोगाने त्याची कार्यवाहीच्या अनुषंगाने दखल घेणे अपेक्षित नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अंतिम भूखंड क्र.४७३ टी.पी.स्कीम १इंच : ५० फूट स्केलच्या नकाशाची प्रत अपीलकर्त्याला हवी असल्यास जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेऊन द्यावी. याबाबतचा पूर्तता अहवाल दि.२०.५.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१२.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रशेखर केदार निकम
इंद्रायणी को.ऑ.हौ.सो., सी विंग, ११,
एकलव्य इंजि.कॉलेजजवळ, कोथरुड, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०१ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.दयानंद सोनकांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कालावधी सन १९९९ ते २००७<br>मिळकत कर क्र.एफ/४/४१/००९२७००० या मिळकतीचे करपात्र मूल्य २८००/- होते, ते बदलून ११८००/- केले गेले व मनमानी करवसूली केली गेली. त्याची चौकशी व्हावी. चौकशी झाली असल्यास चौकशी अहवाल मिळावा. जादा वसूल केलेली रक्कम परत मिळावी. | |

## विवेचन

करपात्र मूल्यात बदल करुन करवसुली केल्याबाबत चौकशी करण्याची व वसुली केलेली अतिरिक्त रक्कम परत मिळण्याची मागणी करणारा अर्ज करुन त्या अनुषंगाने माहिती अपीलकर्ता श्री.चंद्रशेखर केदार निकम यांनी मागितली होती. आपण केलेल्या तक्रारीच्या चौकशीचा अहवाल आपल्याला मिळावा, अशी त्यांची मागणी होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले व त्यांच्या सदनिकेचे करपात्र मूल्य कशा प्रकारे निर्धारित करण्यात आले याचीही माहिती दिली. या माहितीतील विषयाच्या अनुषंगाने श्री.निकम यांनी केलेल्या अपिलात नव्याने चार मुद्यांची खुलासेवजा माहिती मागितली. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहितीची मागणी करणारे हे अपील असल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी ते नाकारले. त्याविरुध्द श्री.निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असून चौकशी अधिकाऱ्याने कोणत्या मुद्दयावर आधारित चौकशी अहवाल द्यावा, हे त्यात नमूद केले आहे.

श्री.निकम यांची मूळ मागणी आपल्या सदनिकेच्या करातील वाढ कमी करण्याची असून त्या अनुषंगाने अर्ज व पत्रव्यवहार त्यांनी केला आहे. अपीलकर्त्याची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. सन २००५ ते २००७ या कालावधीसाठी महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे कराच्या रकमेत ४० टक्के सवलत त्यांना देण्यात आली, २००७ च्या

परिपत्रकाप्रमाणे पूर्ववत कर भरावा असे महानगरपालिका आयुक्तांचे आदेश होते, त्यानुसार कार्यवाही केली व पूर्ण माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले.महानगरपालिका आयुक्त कार्यालयाचे परिपत्रक दि.७.७.२००७ चे असून मान्य धोरणानुसार दि.१.४.२००७ पासून त्याची अंमलबजावणी करावयाची असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे. याबाबतचा तपशील अपीलकर्त्यास कळवावा असा मौखिक आदेश आयोगाने दिला, त्यानुसार रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त(जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि.१४.८.२००८ रोजी आयोगाला सादर केला (प्राप्त दि.२०.८.२००८).

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर दिनकर किर्वे
निवडुंग सहकारी गृहरचना संस्था मर्या., विस्तार बिल्डिंग प्लॉट नं.बी-१४,
ऋतुनगरी, कैलास जीवन फॅक्टरीच्या मागे, ४११०४१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(तांत्रिक),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (व्हेईकल डेपो),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर दिनकर किर्वे
निवडुंग सहकारी गृहरचना संस्था मर्या., विस्तार बिल्डिंग प्लॉट नं.बी-१४,
ऋतुनगरी, कैलास जीवन फॅक्टरीच्या मागे, ४११०४१

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (व्हेईकल डेपो)
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ विद्यमान श्री.नितीन घोगरे
तत्कालीन-श्री.डी.ए.परदेशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे पीएमटी वाहन व्यवहार खात्यात वाहनचालक या पदाच्या नोकरभरती प्रकियेबाबत सविस्तर माहिती मुद्देनुसार मिळावी. भरती प्रक्रिया पूर्ण झाली तरीही माझ्या मुलास कॉल दिला नाही. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिका परिवहन विभागाकडे वाहन चालक वर्गासाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पिंपरी, पुणे-१७ यांनी केलेल्या यादीत आपल्या मुलाचा समावेश असूनही त्याची नियुक्ती का केली गेली नाही अशा स्वरुपाची विचारणा अपीलकर्ता श्री.सुधाकर दिनकर किर्वे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (व्हेईकल डेपो), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे केली होती. संबंधित माहिती श्री.किर्वे यांना कळवूनही स्वीकारली नाही, तसेच प्रथम अपील केलेले नाही. श्री.किर्वे यांचा मुलगा श्री.अमोल सुधाकर किर्वे यांना कामावर घेण्यात आलेले होते. परंतु वैद्यकीय तपासणीत तो अपात्र ठरल्यामुळे त्याला कामावरुन कमी करण्यात आले असे विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नितिन घोगरे व श्री.डी.एस.परदेशी यांनी सांगितले.

नोकरीवर घेण्याबाबतचा निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. संबंधित माहिती श्री.किर्वे यांनी त्याच वेळी स्वीकारावयास हवी होती. ती त्यांना नि:शुल्क देण्यात यावी, या आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाची पूर्तता त्वरित केल्याचा अहवाल

जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट डेपो मॅनेजर, पुणे महानगर, परिवहन महामंडळ, लि. यानी सुनावणीच्या दिवशीच आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.५.२००९